कार्यकर्ता :
असंघटित कष्टकरी पुरस्कार

मनोगत । बस्तू रेगे

# स्वाभिमानातून स्वावलंबनाकडे वाटचाल

बस्तू रेगे यांनी 'महाराष्ट्र दगडखाण असंघटित कामगार विकास परिषदे'ची स्थापना करून या असंघटित व असुरक्षित कामगारांच्या जगण्याचे अनेक प्रश्न मार्गी लावले आहेत. रेशनकार्ड मिळवून देणे, मतदार यादीत नाव घालणे, कामाच्या ठिकाणी स्वच्छ पाणी व आरोग्यसुविधा मिळवून देणे, घरकुलांसाठी हक्काची जागा मिळवून देणे अशा प्रकारे रेगे सध्या काम करतात. पश्चिम-दक्षिण महाराष्ट्रातील आणि मराठवाड्यातील १६ ते १७ जिल्ह्यांतील दगडखाण कामगारांत आज ते काम करीत आहेत. संघर्ष आणि विधायक कार्य या दोन्ही क्षेत्रांत ते कार्यरत आहेत.



माझा जन्म कोल्हापूर जिल्ह्यातील नेसरी गावामध्ये झाला. माझे आई-वडील सहा भावंडांना घेऊन आजी-आजोबांपासून अलिप्त झाले. मी सर्वांत लहान. जेवढे हात कामाला लागतील तेवढे कमीच म्हणून लहानपणापासून सर्वांनाच काही ना काही काम करून पैसे कमविणे व शिक्षण करणे असेच होते. परिस्थितीने वाट्याला आलेल्या अनुभवातून बरेच काही शिकायला मिळाले. इयत्ता १० वी काठावर पास झाल्यावर काय करायचे म्हणून घरच्यांनी विचारले. मला गरिबांची सेवा करायची असे म्हणाल्यावर सर्व हसले.

घाटमाथ्यावरच्या लोकांच्या विकासासाठी आयुष्य झिजवणाऱ्या स्वामी प्रभुधरांच्या सहवासातून ते बेळगाव जिल्ह्यातील हातमाग कामगारांचा लढा उभारणाऱ्या जो चनाकला व शिवाजी कागणीकर यांच्या बरोबर खानापूर तालुक्यामध्ये काम करताना आलेला अनुभव समाजकार्याचा ध्यास दृढ करत होता.

मेंगलोर विद्यापीठातून समाजकार्यातील पदवी शिक्षण घेत असताना मेधा पाटकरांचे नर्मदा बचाव आंदोलन, अण्णा हजारेंची महाराष्ट्रातील भ्रष्टाचार विरोधी चळवळ, मराठवाड्यातील भूकंप यांसारख्या घटनांनी माझ्या शिक्षणाला अर्थ लाभत होता. पदवीतील एक भाग म्हणून गुजरात मधील हरिवल्लभ पारीख यांच्याकडे ब्लॉक प्लेसमेंट करण्याची संधी मिळाली, त्यातून नर्मदा धरण व नर्मदा धरण बाधितांची दुर्दैवी स्थिती जवळून पाहण्यास मिळाली.

**दगडखाण कामगारांच्या सक्रिय सहभागातून रचनात्मक व धोरणात्मक परिवर्तन प्रक्रियेस चालना देण्यासाठी 'संतुलन'ने विविध कार्यक्रमांद्वारे लोकचळवळ हाती घेतली. नाविन्यपूर्ण शिक्षण, बालमजुरीमुक्त खदान, अंधश्रद्धा निर्मूलन, आरोग्य, सुरक्षा, विमा संरक्षण, रेशनकार्ड, धान्य पुरवठा, मतदानात नोंद, निवारा, किमान वेतन, कामगार कायदे, संघटना व सहकारी संस्थांच्या माध्यमातून असंघटित कष्टकऱ्यांची स्वाभिमानातून स्वावलंबनाकडे वाटचाल चालू आहे.**

पुण्यामध्ये एका सामाजिक संस्थेमध्ये प्रकल्प अधिकारी म्हणून काम करत असता सायंकाळच्या सुमारास नगररस्त्यावर शहराकडून दगडाच्या खाणीकडे धावणाऱ्या डंपरखाली शाळकरी मुलाचा अपघात झाला. डंपरचा पाठलाग करत दगडाच्या खाणीत पोहोचलो. दगडाच्या खाणीमध्ये काम करणारी अनोळखी माणसे, वेगवेगळी भाषा, दगडावर दगड ठेवून रचलेली घरे, धुळीने माखलेली दगडाच्या ढिगावर खेळणारी मुले, शहरापासून अवघ्या १० ते १२ किलोमीटर अंतरावर असलेले दिवसभर धुळीत व रात्रीच्या अंधारात नजरे आडचे हे जगच जणू वेगळे. यांच्यासाठी ना शाळा, ना दवापाणी, ना रेशनकार्ड, सतत स्थलांतरामुळे कोणत्याही गावात ना कसल्याही प्रकारची नोंद. जगण्याच्या रेट्यात अस्तित्व हरवलेली ही माणसे.

'माणूस' म्हणून जगण्याचा हक्क प्रत्येकाला आहे, मात्र शिक्षणाशिवाय हे कळणे शक्य नाही या फुले-शाहू-आंबेडकरांच्या विचाराने प्रेरित होऊन सन १९९७ मध्ये वाघोली गावच्या दगडखाण कामगारांसाठी पहिली रात्रशाळा काढली. 'जेथे मूल तेथेच शाळा' पाहिजे ही परिस्थितीची गरज समजून शाळाबाह्य मुले व बालमजुरांसाठी दिवसाची 'पाषाण शाळा' या नावाने पहिली नाविन्यपूर्ण शाळा सुरू केली. खाणक्षेत्रातील अल्पशिक्षित युवा-युवती स्वयंसेवक म्हणून पुढे आले. समाजात वाढत असलेली गरीब व श्रीमंतांमधली विषमता, लिंग, जात व धर्मवादाखाली सामान्यांचे होत असलेले शोषण व कष्टकऱ्यांची पिळवणूक थांबली पाहिजे या विचाराने पॉली उर्फ पल्लवी बरोबर सन १९९८ मध्ये 'संतुलन' (Social AnimatioN Towards United Liberative ActioN) या सामाजिक संस्थेची स्थापना केली.

दगडखाण कामगारांच्या सक्रिय सहभागातून रचनात्मक व धोरणात्मक परिवर्तन प्रक्रियेस चालना देण्यासाठी 'संतुलन'ने विविध कार्यक्रमांद्वारे लोकचळवळ हाती घेतली. नाविन्यपूर्ण शिक्षण, बालमजुरीमुक्त खदान, अंधश्रद्धा निर्मूलन, आरोग्य, सुरक्षा, विमा संरक्षण, रेशनकार्ड, धान्य पुरवठा, मतदानात नोंद, निवारा, किमान वेतन, कामगार कायदे, संघटना व सहकारी संस्थांच्या माध्यमातून असंघटित कष्टकऱ्यांची स्वाभिमानातून स्वावलंबनाकडे वाटचाल चालू आहे.

पाषाण शाळांना शासनाने मान्यता देऊन दगडखाण क्षेत्रातील प्रत्येक मुलापर्यंत शिक्षण पोहोचवावे या मागणीवर सन २००५ मध्ये प्राथमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र शासन पुणे येथे मी पहिले आमरण उपोषण धरले. भाई वैद्य, प्रा. सुभाष वारे, शिक्षक आमदार शरद पाटील व आमदार गजेंद्र ऐनापुरे, पन्नालाल सुराणा, भरत लाटकर, डॉ. बी.एम.

हिर्डेकर आदींच्या सक्रिय पाठिंब्याने राज्य शासनाला दगडखाणक्षेत्रातील मुलांच्या शिक्षणावर विचार करण्यास भाग पडले. राज्य शासनाने पाषाण शाळा प्रस्ताव केंद्राकडे ढकलला. डॉ. भालचंद्र मुणगेकर यांनी दगडखाणीतील मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न केंद्रामध्ये लावून धरला. पुरोगामी महाराष्ट्रात दगडखाण क्षेत्रातील स्थलांतरित दगडखाण मजुरांच्या शेवटच्या मुलापर्यंत शिक्षण पोहोचावे असा आमचा निर्धार आहे.

दगडखाण कामगारांचे जीवनच उघड्यावर. ना मालक, ना शासन, ना सरकार. एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी सतत स्थलांतरामुळे कोणीही फसवावे. वाघोली येथील गायरानांवर अनेक जातीजमातीच्या कामगार कुटुंबांची बिननावाची वस्ती. त्यातील अत्याचाराने पीडित महिला व युवकांनी निर्धार करून एका मध्यरात्री एका अत्याचारी गड्यावर जोरदार हल्ला केला. वस्तीत कामगारांची रात्रीची मीटिंग चालू होती. कसेतरी करून त्या इसमाला गर्दीतून बाजूला केला, अन्यथा अनर्थ घडला असता. लोकांची पहिली पंचायत बसवली. तेव्हापासून महिलांच्या स्वाभिमानाला छेडण्याचे धाडस कोणाकडून होत नाही. आपसांतले अनेक वाद आमनेसामने बसून सोडवल्याने कामगारांतील भेदभाव कमी झाले.

दगडाच्या खाणीत अपघाती मृत्यू झालेल्या माणसाची किंमत नव्हती. उरलेसुरले शरीराचे तुकडे फडक्यात गुंडाळून मालक नातेवाईकांना गावाकडे पाठवायचा. अनेक वेळा ही मढी वाटेतच पुरून दुसऱ्या दगडाच्या खाणीच्या शोधात ही कुटुंबे गायब व्हायची. आता परिस्थिती बदलली. अपघातस्थळी कामगार जमा होतात व न्याय मिळाल्याशिवाय कामगार माघार घेत नाहीत.

दगडखाण कामगारांची गणना असंघटित क्षेत्रामध्ये केल्याने कामगारांची कसल्याही प्रकारचे नोंद नाही. कोणत्याही कायद्याची अमलबजावणी नाही. कोणत्याही प्रकारचे संरक्षण देण्याची जबाबदारी प्रशासनाला वाटत नाही. सततच्या स्थलांतरामुळे कामगारांची नोंद मतदार यादीत नसल्याने राज्यकर्ते कामगारांच्या प्रश्नावर उदासीन. असंघटितांच्या प्रश्नांवर संघर्ष करणारे बाबा आढाव यांची प्रेरणा घेऊन मिनी बेदी, डॉ. मिलिंद बोकील, शिरीष कुलकर्णी आदींच्या सहकार्याने दगडखाण असंघटित कामगार विकास परिषदेची स्थापना केली. लोकांच्या सहभागातूनच लोकांचा विकास साधणारे सूत्र आपले करून संतुलनने कामगार संघटना, महिला व कामगार सहकारी संस्था, शिक्षण मंडळ आदींची निर्मिती केली आहे.

वंचितांच्या हक्कांसाठी संघर्ष करणाऱ्या कार्यकर्त्यांना अनेक प्रकारचे दबाव सहन करावे लागतात. संस्थेची जीप जाळली, राहत्या घराला आग लावून संस्थेच्या कागदपत्रांसोबत प्रापंचिक साहित्य जळून खाक झाले. केवळ प्रसिद्धी माध्यमांची साथ व लोकचळवळ पाठीशी असल्यामुळे कदाचित जिवावर हल्ला करण्याचे धाडस होत नसावे.

आनंद सराफ सारख्यांच्या पुढाकाराने पुण्यात दहीहंडीच्या ठिकाणी पाषाण शाळेतील मुलांनी लुटली पुस्तकहंडी, अगरवाल भाभींनी महालक्ष्मीमंदीरात दगडखाणीतील मुलींचे पायधुने व देवकरांनी देवीला मिळालेल्या साड्या लिलावात विकण्याऐवजी दगडखाणीतील भगिनीना वाटप, पुणे शहरातील रस्त्यावर भीक मागणाऱ्या मुलांसाठी घरटे निर्मितीमध्ये पुढाकार घेणारे डॉ. दिलीप सारडा अशा प्रकारे विधायक कामातून समाज परिवर्तनाचे प्रयत्न करणारे पुणेकर. संतुलित समाजव्यवस्था निर्माण करण्याचे प्रयत्न चळवळीतील कार्यकर्त्याला प्रोत्साहन देणारे आहेत.

महात्मा गांधींच्या विचाराप्रमाणे विकास हा शेवटच्या माणसाचा झाला पाहिजे. मात्र आज दऱ्याखोऱ्यांत, दगडखाणीत लाखोंच्या संख्येने जीवन जगणाऱ्या माणसांपर्यंत विकास पोचलाच नाही. भरपूर करायचे आहे... धोरणे बदलायची आहेत... माणसांसाठी कायदे बनवायचे आहेत...

झिंदाबाद!

**बस्तू रेगे**
संतुलन भवन, सर्व्हे नं. ५५/२, तुळजाभवानी नगर,
नगर रोड, खराडी, पुणे ४११०१४.
Mob. 9371206750
santulan@vsnl.net

ओळख । **सुभाष वारे**

# दगडखाणीत घडताहेत नवे एकलव्य

अॅड. बस्तू रेगे यांच्याशी माझी पहिली ओळख एका मोर्चात झाली. पुणे जिल्ह्यातील दगडखाणीत काम करणाऱ्या स्त्री-पुरुष कामगारांचा मोर्चा बस्तू रेगे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी आखला होता. मागण्या फारच साध्या, मूलभूत, परंतु भारताच्या साठीतल्या स्वातंत्र्याचं विदारक दर्शन घडविणाऱ्या होत्या. मतदारयादीत आमचं नाव घाला, आम्हांला रेशनकार्ड द्या आणि दोनवेळची चूल पेटवायची व्यवस्था करा, आम्हांला पिण्याच्या पाण्याची सोय नाही त्याचं काहीतरी बघा, बास्. म्हणजे या स्वतंत्र भारताचे आम्ही नागरिक आहोत, पण आम्हांला ती नागरिकत्वाची ओळखही अद्याप मिळालेली नाही आणि माणूस म्हणून जगण्याच्या सुविधाही अद्याप मिळाल्या नाहीत त्यासाठी मोर्चा. या मोर्चाच्या निमित्ताने बस्तू रेगे, त्यांच्या पत्नी पल्लवी रेगे आणि त्यांचे सहकारी यांची झालेली ओळख वाढत गेली. त्यांच्या कामाचं महत्त्व जाणवत गेलं.

रेगेंचा जन्म कोल्हापूरकडच्या नेसरी गावातला. कोल्हापूरकडची माणसे म्हणजे कमावलेला आवाज आणि कमावलेले शरीर. कोल्हापूरची माणसे समोरच्याला एखादी गोष्ट समजावून देतानासुद्धा आपल्या खास कमावलेल्या आवाजात इतके आग्रही बोलतात की समोरच्याला वाटावे ही आपल्याला दमच देत आहेत. रेगे मात्र त्याला अपवाद. त्यांच्या बोलण्यात सतत एक प्रकारचा आर्जवीपणा असतो, ज्यातून त्यांच्यातल्या कार्यकर्त्याची ओळख होत जाते. पाच फुटाच्या आसपास उंची. खादीचा अर्ध्या बाह्यांचा शर्ट. लहानपणी व्यायाम केला असेल की नाही माहीत नाही, पण जगण्यासाठी आणि शिक्षणासाठीच्या पैशाकरिता गावाचे सार्वजनिक पाण्याचे हौद भरणे, गावभर फिरून टोस्ट विकणे, डेअरीत गायी-म्हशी धुणे, त्यांचे दूध काढणे अशी भरपूर कष्टाची कामे केल्याने शरीराला आणि मनालाही आलेली बळकटी स्पष्टपणे जाणवते. अॅड. बस्तू रेगे हे शेतकरी कुटुंबातले, परंतु घरातली सदस्यसंख्या आणि जिराईत शेतीतील आवक यांच्या व्यस्त प्रमाणामुळे गरिबीचा अनुभव पुरेपूर घेतलेला. त्यामुळे स्वत:च्या हिमतीवर शिक्षण घेत असताना समाजातील वास्तवाचे, गरीब श्रीमंत थराचे, जातिग्रस्त समाजातील विषमतेचे भान आपोआपच आलेले.

रेगेंच्याबद्दल बोलताना त्यांच्या पत्नीबद्दलचा उल्लेख सहज जाता जाता करण्याइतका साधा सोपा नाही. पल्लवीताई या पंजाबच्या. कॉलेज शिक्षण घेत असताना त्यांची आणि बस्तू रेगेंची ओळख झाली, तिचे रूपांतर पुढे विवाहात झाले. पण हे कॉलेज समाजकार्याचे शिक्षण देणारे एम.एस.डब्ल्यू.चे कॉलेज असल्याने त्यांच्या ओळखीत, मैत्रीत आणि प्रेमविवाहातही सामाजिक प्रश्नांचे भान, त्याबद्दलची संवेदनशीलता आणि प्रश्न सोडवण्यासाठी काहीतरी करण्याची ऊर्मी यांबद्दल दोघांच्याही मनात असलेल्या समान भावनांचेच एकमेकाला अधिक आकर्षण वाटले असावे. आज दगडखाण कामगारांच्या मुलांमुलींसाठी पाषाणशाळा चालविणारी 'संतुलन' संस्था असो की दगडखाण कामगारांच्या माणूस म्हणून जगण्याच्या साध्या साध्या प्रश्नांवर संघर्ष करणारी दगडखाण कामगार विकास परिषद असो; पल्लवीताई बस्तू रेगेंना केवळ साथ देत आहेत असे नाही तर आघाडीवर राहून हे संघटन बांधत आहेत. दगडखाणीतील धुळीत माखलेल्या आणि नवऱ्यांच्या दारूच्या व्यसनाने गांजलेल्या अशिक्षित महिलांसोबत पल्लवीताई ज्या पद्धतीने संवाद साधतात आणि नंतर त्या महिलांच्या डोळ्यात पल्लवीताईंबद्दल जी आपुलकी झळकते ती केवळ पाहूनच अनुभवता येईल. कार्यक्रमाच्या स्टेजवर आवर्जून महिला असाव्यात हा आग्रह धरण्यापासून ते कार्यक्रमासाठी प्रवास करताना महिला आहेत आणि त्याही दगडखाण कामगार महिला आहेत म्हणून जीपच्या मागच्या सीटवर त्यांनी बसायचे काही कारण नाही असा आग्रह धरून पल्लवीताई या महिलांच्या मनातील अस्मिता जागवत असतात. महाराष्ट्राच्या बाहेरचे लोक महाराष्ट्रात येऊन मजुरी करतात, कष्ट करतात, स्वत:चे पोट भरताभरताच

महाराष्ट्राच्याही संपत्तीत भर घालतात ही जशी उदाहरणे आहेत तशीच पंजाबीभाषिक पल्लवीताई महाराष्ट्रातील दगडखाणीत फिरतात, तेथील धूळ अनुभवतात, पांढऱ्याफेक धुळीनं रूक्ष बनलेलं वातावरण पाहतात आणि गरिबीने-अज्ञानाने गांजलेल्या लोकांच्या तितक्याच रूक्ष आयुष्यात आधी हक्काची जाणीव नंतर माणुसपणाची अस्मिता आणि त्यानंतर एका विकसित आणि फुललेल्या आयुष्याची ओढ मराठीभाषिक बस्तू रेगेंच्या बरोबरीने रुजवू पाहतात तेव्हा त्यांच्या आंतरप्रांतीय-आंतरधर्मीय विवाहाचे महत्त्व लक्षात येते. स्वत:च्या स्वार्थी राजकारणाच्या झटपट यशासाठी एक शॉर्टकट म्हणून मराठीच्या खोट्या अस्मितेचा मुद्दा, विद्वेषाचे हत्यार म्हणून वापरीत, हिंदीभाषिक कष्टकऱ्यांवरती विखारी शाब्दिक आणि शारीरिक हल्ले करणाऱ्यांनी बस्तू रेगे आणि पल्लवीताईंच्या कामातील नवनिर्माण अनुभवण्याजोगे आहे.

बस्तू रेगे यांचं शालेय शिक्षण महाराष्ट्रात, महाविद्यालयीन शिक्षण गोव्यात आणि एम.एस.डब्ल्यू.चं शिक्षण कर्नाटकात झालं. पुढे पुण्यात आल्यावर त्यांनी कायद्याची पदवीही घेतली. सामाजिक कार्याचे धडे त्यांनी गोव्याच्या महाविद्यालयीन शिक्षणाच्या काळातच घेतले. गरिबीच्या अनुभवातून निर्माण झालेली संवेदनशीलता आणि तारुण्याची ऊर्मी यांतून महाविद्यालयीन युवकांचा एक गट एकत्र आला आणि श्रमदान, प्रबोधनफेरी असे उपक्रम सुरू झाले. दरम्यान महाराष्ट्रातील अण्णा हजारे यांचं भ्रष्टाचारविरोधी आंदोलन आणि मेधा पाटकरांचं नर्मदा बचाओ आंदोलन यांनी रेगेंना महाराष्ट्रात परत खेचून आणलं, असं ते मानतात. रेगेंच्या स्वतंत्र कामाची सुरुवात झाली तो अनुभव मोठा वेदनादायी आणि तरीही संवेदनशील असा आहे. पुण्याच्या आगाखान पॅलेसजवळील एका स्वयंसेवी संस्थेतील काम आटोपून बाहेर पडले असता रेगेंनी एक ॲक्सिडेंट पाहिला. तेरा वर्षांच्या एका मुलाला डंपरने उडवले होते. जीव गमावलेल्या त्या मुलाच्या विधवा मातेने फोडलेला हंबरडा रेगेंना अस्वस्थ करून गेला. त्या मातेला न्याय देण्यासाठी त्यांनी त्या डंपरचा शोध सुरू केला आणि ते पोहोचले पुण्याजवळील वाघोली परिसरातील खाणी आणि क्रशरच्या साम्राज्यात. तिथं त्यांनी बघितले भटक्या विमुक्त समाजातील, दलित-आदिवासी समाजातील आणि अल्पसंख्य मुस्लिम समाजातील स्त्री-पुरुष. पहाड फोडून दगड काढताना पहाडासारखी हिम्मत दाखविणारे पण गरिबी आणि शोषणाबरोबर लढताना हरून हतबल झालेले. शहरात सर्वत्र बांधकाम व्यवसायाने वेग घेतला आहे. उंच उंच इमारती आणि देखणे बंगले उभे राहत आहेत. त्यातून बिल्डर, कॉन्ट्रॅक्टर गब्बर होत आहेत. जागतिकीकरणातून ज्यांच्याकडे अमाप पैसा आला त्या वर्गासाठी सुखवस्तू घरे बांधली जात आहेत. घरातील प्रत्येक पुरुष सभासदासाठी स्वतंत्र घर उभे केले जात आहे. प्रसंगी भविष्याची गुंतवणूक म्हणून जास्तीचंही एक बांधून ठेवलं जात आहे. या घरांसाठी पहाड फोडणारी, खडी बनविणारी माणसं(?) मात्र वाघोली परिसरात घाम गाळतात, पुरेशा पोषणाअभावी मांस झिजवतात, तिथल्या धुळीने खोकून खोकून तरुणवयात दमेकरी बनतात, पाठदुखीच्या आजारापुढे गुडघेच नव्हे तर हातही टेकतात. कष्ट करतच स्वत:चे पोट भरण्याचा अयशस्वी प्रयत्न करतात, परंतु मुक्त अर्थकारणाच्या लाभार्थींचे झगमगाटी विश्व उभे करण्यासाठी पायाचे दगड मात्र यशस्वीपणे होतात. हे सर्व रेगेंनी पाहिलं. ते आले होते एका विधवा मातेला न्याय देण्यासाठी एका डंपरच्या शोधात पण त्यांना दिसले, असे शेकडो डंपर आणि न्यायाची वाट पाहात असणारे हजारो दगडखाण कामगार. रेगेंना पुढच्या कामाची वाट सापडली. दगडखाण कामगारांच्या मुलांमुलींसाठी संतुलन संस्थेची पहिली पाषाणशाळा उभी राहिली. या शाळेला जागा खाणमालकाने नाही दिली, ती उभी राहिली एका कामगाराच्या तुटक्या झोपडीत. एका

**दगडखाणीत, क्रशरच्या खडखडाटात, शेकडो डंपरच्या धडधडाटात आणि धुळीच्या साम्राज्यात रेगेभाऊ हक्काची जाणीव आणि आत्मसन्मानाची पेरणी करत आहेत. पाषाणशाळेत नव्या एकलव्यांना घडवत आहेत. महात्मा फुल्यांनी आणि सावित्रीमाईने दलित-बहुजनांच्या शिक्षणाचा पाया रचला. 'संतुलन'च्या पाषाण शाळा त्या लढाईची व्याप्ती वाढवीत आहेत. बाबासाहेब आंबेडकरांनी दलित समाजाला स्वाभिमान आणि आत्मसन्मान शिकविला. दगडखाण कामगार विकास परिषद त्याही लढाईला पुढे नेण्याचे काम करीत आहे, आणि हे करतानाच, गांधीजींनी अवघ्या जगाला दिलेल्या सत्याग्रहाच्या अस्त्राला अधिक धारदार बनविण्याचे काम रेगेभाऊ, पल्लवीदीदी आणि त्यांचे असंख्य सहकारी करीत आहेत.**

पाषाणशाळेपासून सुरू झालेला हा प्रवास आज खूपच विस्तारला आहे. जवळपास १५-१६ जिल्ह्यांत आज दीडशे पाषाणशाळांमधून २४४८४ मुले-मुली 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' हा बाबासाहेब आंबेडकरांचा धडा गिरवत आहेत. या विद्यार्थ्यांत ५५ टक्क्यांच्या आसपास मुली आहेत, तर अगदी स्वाभाविकपणे यांपैकी ९३ टक्के विद्यार्थी हे भटके-विमुक्त, आदिवासी, दलित आणि इतर मागास समाजांतील आहेत. जातीनिहाय आरक्षण आणखी किती वर्षे, असे कुत्सितपणे विचारणाऱ्यांनी हे वास्तव आणि याच समाजाचे शासनाच्या क्लास वन, क्लास टू नोकऱ्यांतील अत्यल्प प्रमाण याची तुलना जरूर करावी. अशाच एका पाषाणशाळेत सामील झालेल्या सुनीता निंबाळकर या मुलीने चार वर्षांत एकूण आठ इयत्तांचे शिक्षण पूर्ण करून दहावीत पहिला वर्ग मिळवला आहे. वाढलेल्या वयासह उशीरा शाळेत दाखल झालेल्या सुनीताला वय जास्त असल्याने ही कसरत करावी लागली. सुनीतापुढे आणखी शिकण्याचे स्वप्न तर आहेच, परंतु शिक्षण संपल्यावर दगडखाण कामगारांच्या मुलींसाठी वसतिगृह चालविण्याचे स्वप्न तिने समोर ठेवले आहे, ही बाबच या कामात हक्काबरोबरच जबाबदारीची जाणीव रुजत असल्याचे चिन्ह आहे. रेगेंच्या संतुलन संस्थेचा आणि दगडखाण कामगार विकास परिषद या संघटनेचा विस्तार आज पुढील आकडेवारीवरून लक्षात येईल –

२४,४८४ बाल कामगारांना शिक्षणप्रवाहात आणले.

१४३ भीक मागणाऱ्या मुलांचे पुनर्वसन झाले.

२४४८४ मुलामुलींना पोषक आहार मिळाला, त्यांचे आरोग्य सुधारले.

२०,००० दगडखाण कामगारांना विविध आरोग्य योजनांचा फायदा.

२५,००० असंघटित खाणकामगारांना जनश्री विमा योजनेचा लाभ.

१५ अपघातग्रस्त कुटुंबांना ४,२५,००० रुपयांचे विमालाभ.

२५०० खाणकामगार कुटुंबांना शिधापत्रिका मिळवून दिल्या.

१०,००० लोकांना खाण विकास फंडामार्फत पाणी सुविधेचा लाभ.

२०० खाण कामगार कुटुंबांना वीज जोड मिळवून दिले.

४५० अन्यायग्रस्त व्यक्तींच्या तक्रारींची नोंद कायदा व सल्ला केंद्रात करवून घेतली.

१८९ महिला बचत गट ग्रामीण, झोपडपट्टी परिसर आणि दगडखाण कामगारांसाठी चालतात.

वाघोली दगडखाण क्षेत्रातील कामगारांना स्वतंत्र पाणी योजना, रेशनदुकान, प्राथमिक आरोग्य सुविधा केंद्र मिळवून दिले. या शिवाय एका महिला पतसंस्थेची, एका महिला औद्योगिक संस्थेची उभारणीही या सर्व कामाच्या माध्यमातून सुरू आहे. पश्चिम-दक्षिण महाराष्ट्र आणि मराठवाड्यातील काही जिल्हे असा एकूण १५ ते १६ जिल्ह्यांत हा सर्व पसारा आहे.

या सर्व कामाची सुरुवात जशी एका वेदनेतून झाली तसाच इथपर्यंतचा प्रवासही कष्टदायक, थकवणारा, अनेक वेळा निरुत्साही करणारा परंतु सर्वसामान्य कष्टकऱ्यांच्या सहकार्याच्या भावनेवर आणि त्यातही कष्टकरी महिलांच्या सक्रिय पुढाकारातून पुढे नेणारा ठरला आहे. छोट्या छोट्या मागण्यांसाठी सरकारदरबारी उंबरठे झिजवताना, मोर्चे काढताना, धरणेआंदोलन करताना प्रशासनातील बहुसंख्य सरकारी बाबूंच्या नकारात्मक आणि असंवेदनशील प्रतिसादाने आलेली निराशा खाणकामगारांच्या जिद्दीमुळे आणि एकीमुळेच केवळ पळवून लावता आली असे रेगेभाऊ व पल्लवीदीदी आवर्जून नोंदवितात. सर्व खाणकामगार आणि पाषाणशाळेतील मुले त्यांना प्रेमाने आणि आदराने भाऊ आणि दीदी म्हणूनच हाक मारतात.

पाषाणशाळेतील मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी, सरकारदरबारी या शाळांना मान्यता मिळावी यासाठी दिल्लीपर्यंत झगडावे लागले. भालचंद्र मुणगेकरांसारख्या नियोजन आयोगाच्या तत्कालीन सदस्यांनी थोडी मदत केल्याने प्रश्न मार्गी लागला. नव्या शिक्षण हक्क कायद्याचा सोयिस्कर अर्थ काढून सरकारी बाबूंनी या शाळांसमोर पुन्हा अडचणी वाढविल्या आहेत. दगडखाण कामगारांसाठी कायद्याने आणि हक्क म्हणून रेशनसुविधा, हक्काचे घर, माफक दरातील आरोग्यसुविधा, कामाच्या ठिकाणची सुरक्षितता आणि प्रचंड कष्टाची कामे केल्यानंतर लवकरच येणाऱ्या म्हातारपणाची सुरक्षा हे प्रश्नही असेच लढत झगडत इंच इंच लढवू पद्धतीने पुढे जात आहेत. त्यासाठी निवेदनं द्यायची, आठवणीसाठी धरणे आंदोलनं करायची, तेवढ्याने भागले नाही तर मोर्चा काढायचा. मोर्चाने जे पदरात पडेल त्याच्या प्रामाणिक अंमलबजावणीसाठी पुन्हा सहाव्या वेतन आयोगाच्या पगाराने मस्त आणि सुस्त झालेल्या सरकारी बाबूंना भिडायचे असा हा थकविणारा प्रवास आहे. पण आधी म्हटल्याप्रमाणे दगडखाण कामगारांची जिद्द, साथ आणि एकी प्रत्येकवेळी नव्याने बळ देते. या कष्टकऱ्यांच्या उत्साहाने रेगेभाऊ आणि पल्लवीदीदीही मग नव्या जिद्दीने पुन्हा कामाला लागतात. या कामगारांच्या प्रश्नांसाठी सरकारी कार्यालयात अधिकाऱ्यांपुढे युक्तिवाद करताना, प्रतिवाद मांडताना एरवी

शांत आणि आर्जवी पद्धतीने भूमिका मांडणारे रेगेभाऊ आणि पल्लवीदीदी एकदम आग्रही आणि आक्रमक बनतात. आतापर्यंत जिल्हाधिकारी कचेरीत, मनपा आयुक्तांच्या कार्यालयात आणि मंत्रालयात रेगेभाऊ, पल्लवीदीदी आणि त्यांचे कार्यकर्ते एका बाजूला आणि या कामगारांना काही द्यावेच लागले तर जणू काही ते आपल्याच खिशातून जाणार आहे या भीतीने ताठर आणि अडून बसलेले सरकारी अधिकारी दुसऱ्या बाजूला, या सामन्यात मीही तीन-चार वेळा सामील असल्याने अनुभवसिद्ध असे माझे हे मत आहे. सर्वच जनआंदोलकांना हा जो इंच इंच लढवू अनुभव येतो तो खरोखरच क्लेशदायी आणि प्रसंगी कायद्याच्या राज्यावरील आणि लोकशाही व्यवस्थेवरील विश्वास उडविणारा असतो. परंतु समतेच्या तत्त्वावरील निष्ठा आणि सत्याग्रहाची शिकवण ही जशी अशा वेळी उपयोगी पडते तसाच हिंसेचा मार्ग कष्टकरी समुदायाला न्याय देण्यासाठी व्यावहारिक अंगानेही उपयुक्त नाही ही वास्तवाची जाणीव जनसंगठन आणि त्याचा दबाव वाढविण्यासाठी अधिक सक्रिय करते. कारण जुलमी राजे असोत की लोकशाहीतील नवे संस्थानिक व त्यांची दमनकारी प्रशासन यंत्रणा असो, हिंसाचाराची आणि दडपशाहीची त्यांची क्षमता आणि ती बिनदिक्कत वापरायची मानसिकता कष्टकऱ्यांपेक्षा केव्हाही जास्तच असते.

असंघटितांना संघटित करणारे, असुरक्षितांसाठी सुरक्षितता मिळवू पाहणारे रेगे यांच्यासमोर अजून बरीच स्वप्ने आहेत. त्यासाठी त्यांची संवेदनशील आणि शोधक नजर असंघटितांच्यामधलेही आणखी असंघटित समाजघटक शोधत असतात. असुरक्षितांच्यामधीलही आणखी वंचित घटक शोधत असतात. मागील आठवड्यात त्यांनी पुणे महानगरपालिकेसमोर फुटपाथवासीयांचे धरणे आंदोलन आयोजित केले होते. रस्त्यावरून प्रवास करताना ही खंगलेली, मळलेली कित्येक दिवस आंघोळ न केलेली फुटपाथवासी जनता तर सर्वच जण पाहतात. त्यांच्यापैकी एखादा भीक मागण्यासाठी अधिक जवळ आला/आली तर बहुतेक जण अंग चोरून घेतात. रेगे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी मात्र 'फुटपाथनिवासी परिषद' या नावाने त्यांची संघटना बांधायचे ठरवले आहे. त्याकरिता ते त्यांच्यात मिसळतात, त्यांच्याशी गप्पा मारतात. फुटपाथवरच त्यांची मीटिंग घेतात. या फुटपाथवासियांना संघटना, घोषणा सगळंच नवं नवं वाटतं. रेगेभाऊ त्यांना झिंदाबाद म्हणायला शिकवितात आणि गमतीचा भाग म्हणजे हे फुटपाथवासीय रेगेभाऊंना 'झिंदाबादभाऊ' या नावानेच हाक मारतात.

आम्ही एकेकाळी बँक-विमा-टेलिफोन कर्मचारी, कारखान्यातील कामगार आणि शिक्षक-प्राध्यापकांना भांडवलशाहीच्या विरोधातील क्रांतीचे अग्रदूत मानले. त्यांच्या बोनसपासून पाच दिवसांच्या आठवड्यापर्यंतच्या लढाया केल्या. संघटित कामगारवर्गाला कायद्याचे भरभक्कम संरक्षण दिले; पण हे सगळं मिळाल्याबरोबर या संघटित कामगारवर्गाच्या जाणीवाच बदलल्या. हा वर्ग एकाच वेळी नकली अध्यात्माच्या तितक्याच भ्रामक कर्मकांडी, दांभिक संस्कृतीचा वाहक आणि देशी-विदेशी बलाढ्य कंपन्यांच्या चंगळवादी वस्तूंचा ग्राहक बनला. सर्वसामान्य गरीबांना न्याय देण्याच्या लढाईतील आपली भूमिका विसरला. त्यानंतर 'कामगार' शब्दाची व्याख्या बदलली. चळवळीचा केंद्रबिंदू सरकला. हमाल, मोलकरणी (घरेलू कामगार), रिक्षाचालकांच्या संघटना उभ्या राहू लागल्या. हे असंघटित-असुरक्षित कामगारच आता चळवळीचे नायक बनून व्यवस्थेला धडका देऊ लागले. रेगेंचं दगडखाण कामगार संगठन, फुटपाथवासीयांचं संगठन हे या असंघटितांच्या चळवळीतील आणखी एक पुढचं पाऊल मानलं पाहिजे. या अर्थाने रेगेंच्या कामाचं मोल समजून घ्यावं लागेल.

दगडखाणीत, क्रशरच्या खडखडाटात, शेकडो डंपरच्या धडधडाटात आणि धुळीच्या साम्राज्यात रेगेभाऊ हक्काची जाणीव आणि आत्मसन्मानाची पेरणी करत आहेत. पाषाणशाळेत नव्या एकलव्यांना घडवत आहेत. महात्मा फुल्यांनी आणि सावित्रीमाईने दलित-बहुजनांच्या शिक्षणाचा पाया रचला. 'संतुलन'च्या पाषाण शाळा त्या लढाईची व्याप्ती वाढवीत आहेत. बाबासाहेब आंबेडकरांनी दलित समाजाला स्वाभिमान आणि आत्मसन्मान शिकविला. दगडखाण कामगार विकास परिषद त्याही लढाईला पुढे नेण्याचे काम करीत आहे, आणि हे करतानाच, म. गांधीजींनी अवघ्या जगाला दिलेल्या सत्याग्रहाच्या अस्त्राला अधिक धारदार बनविण्याचे काम रेगेभाऊ, पल्लवीदीदी आणि त्यांचे असंख्य सहकारी करीत आहेत. त्यांच्या कामाला मनापासून सलाम!

**- सुभाष वारे**
एस. एम. जोशी सोशलिस्ट फाउंडेशन,
नवी पेठ, पुणे ४११०३०.
Mob. 9822020773.